आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः08.03.2026 वारः रविवार

---

१. घरगुती तसंच व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत वाढ
२. पश्चिम आशियात सलग नवव्या दिवशी क्षेपणास्त्रं, ड्रोन आणि विमान हल्ले सुरूच, या अस्थिरतेमुळे आखातातून आठ दिवसात ५२ हजारांहून अधिक भारतीय नागरिक माघारी
३. तेलंगणमध्ये १३० माओवादयांचं आत्मसमर्पण
४. महिला दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचं आयोजन आणि
५. टी-ट्वेंटी विश्व चषकासाठी आज भारत-न्यूझीलंड लढत

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे इतकी झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत देखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.
होर्मूझच्या सामुद्रधुनीतली जलवाहतूक बंद झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यात खंड पडल्याच्या समाज माध्यमांवर प्रसृत झालेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असून भारताकडे पुरेस इंधन साठे आणि पर्यायी पुरवठा स्रोत आहेत असं हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीनं स्पष्ट केलं आहे. इंधन पुरवठ्यामधला व्यत्यय किंवा तुटवडा या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये तसंच पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असं कंपनीनं ट्विट करून सांगितलं आहे.

<u>प.आशिया संघर्ष</u>

अमेरिका, इस्रायल आणि इराणकडून क्षेपणास्त्रं, ड्रोनचे तसंच हवाई हल्ले सुरूच असल्यानं गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेला पश्चिम आशियातील संघर्षाचं लोण आता आखाती भागातील अनेक देशांमध्ये पोहोचलं आहे.

आमचा उद्देश साध्य होत नाही तोपर्यंत इराणविरुद्धची आमची लष्करी कारवाई सुरूच राहील, असं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामीन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमावर सामायिक केलेल्या एका व्हिडिओ संदेशात त्यांनी सध्या सुरू असलेल्या या संघर्षात इस्रायली वैमानिक, सैनिक आणि संरक्षण दलांचं तसंच देशातील नागरिकांनी दाखवलेल्या धैर्याबद्दल त्यांचं कौतुक केलं आहे. या संघर्षात इस्रायल यशस्वी होण्यामुळे जगाला असलेला अण्वस्त्रांचा धोका दूर होऊन इस्रायल आणि इराण दरम्यान शांतता निर्माण होऊन पर्यायानं एकंदर क्षेत्रातच शांतता प्रस्थापित होईल असं नेतान्याहू यांनी या संदेशात नमूद केलं आहे. दरम्यान पार्चिन आणि शहृद या दोन प्रमुख क्षेपणास्त्र निर्मिती केंद्रांवर हवाई हल्ले करण्यात आल्याचं इस्रायलच्या संरक्षण खात्यानं म्हटलं आहे. तर इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स या दलानं आपण हैफा तेल शुद्धिकरण केंद्रावर खैबरशेकन क्षेपणास्त्रांचा हल्ला केल्याचा दावा केला आहे. हिज्बुल्ला गटानंही हैफा नाविक तळावर क्षेपणास्त्रांनी हल्ला केल्याचा दावा केला आहे. तत्पूर्वी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी आपल्या शेजारील देशांमधून जोवर हल्ला केला जात नाही, तोवर त्यांना लक्ष्य करण्यात येत नसल्याचं म्हणत आतापर्यंत केलेल्या हल्ल्यांबद्दल माफी मागितली होती. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये १ हजार ३३२ इराणी नागरिकांचा बळी गेला असल्याचं संयुक्त राष्ट्रसंघातील इराणच्या राजदूतांनी म्हटलं आहे.

<u>भारतएमईए</u>

आखातात संघर्ष सुरू झाल्यापासून एक ते ७ मार्च या कालावधीत तिथून ५२ हजारांहून अधिक भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी आणण्यात आलं असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. यापैकी ३२ हजार १०७ प्रवाशांना भारतीय विमान कंपन्यांच्या विमानातून आणण्यात आलं, तर उर्वरित प्रवासी परदेशी कंपन्यांच्या विमानातून माघारी परतले, असं परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. पश्चिम आशिया तसंच आखाती प्रदेशातल्या घडामोडींकडे भारत सतत लक्ष ठेवून आहे. तसंच अल्प कालावधीसाठी तिथे गेलेल्या तसंच अन्यत्र प्रवास करताना तिथे अडकून पडलेल्या भारतीय प्रवाशांना त्याचा त्रास होणार नाही यावर विशेष लक्ष देण्यात येत असल्याचंही जयस्वाल यांनी नमूद केलं. दरम्यान पश्चिम आशियातील स्थितीचा विमान सेवेवर मोठा परिणाम झाला असून काल दिल्ली आणि मुंबईतळावरून होणारी तसंच तिथे येणारी किमान १०० आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणं रद्द करण्यात आली.

पश्चिम आशियातील सध्याची युद्ध परिस्थिती लक्षात घेता सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं ९, १० आणि ११ मार्च रोजी होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. परीक्षांच्या नवीन तारखा नंतर जाहीर केल्या जातील असं मंडळाने आपल्या निवेदनात

म्हटलं आहे. याबाबतच्या माहितीसाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळांशी संपर्कात राहण्याचा आणि अधिकृत घोषणांचं पालन करण्याचा सल्ला दिला आहे.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>नेपाळ</u>**

नेपाळमधील संसदीय निवडणुकीत प्रचंड विजय मिळवून प्रस्थापित पक्षांना पराभूत करणारा बालेंद्र शाह यांचा राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष नेपाळमध्ये सरकार स्थापन करण्यास सज्ज झाला आहे. पंतप्रधानपदाचे उमेदवार ३५ वर्षीय बालेन यांनी चार वेळा पंतप्रधानपद भूषविलेल्या केपी शर्मा ओली यांचा ५० हजार मतांनी पराभव केला. काल रात्री साडेनऊ वाजेपर्यंत जाहीर झालेल्या ९७ जागांपैकी आरएसपीने ७७ जागा जिंकल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुका यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल नेपाळच्या जनतेचे आणि सरकारचे अभिनंदन केलं आहे. एक जवळचा मित्र आणि शेजारी म्हणून, भारत नेपाळच्या लोकांसोबत आणि त्यांच्या नवीन सरकारसोबत शांती, प्रगती आणि समृद्धीच्या नवीन उंची गाठण्यासाठी जवळून काम करण्यासाठी उत्सुक असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

**<u>माओवादी-आत्मसमर्पण</u>**

तेलंगणचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांनी गणपतीसह माओवादी गटाच्या सर्व केंद्रीय समिती सदस्यांना आत्मसमर्पण करण्याचे, मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आणि राज्याच्या पुनर्बांधणीत सक्रिय सहभाग घेण्याचं आवाहन केलं आहे. काल हैदराबाद इथं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत १३० माओवादयांनी आत्मसमर्पण केल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आल्याबद्दल अभिनंदन केलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना आर्थिक पॅकेज देण्यास तयार असल्याचंदेखील मुख्यमंत्री रेड्डी यांनी म्हटलं आहे. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी पोलिस अधिकाऱ्यांचे अभिनंदन केलं.

**<u>महिला दिन</u>**

हक्क, न्याय आणि कृती या मध्यवर्ती संकल्पनेसह आज जगभर आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात येत आहे. यंदाची या दिनाची संकल्पना महिलांना न्यायाची कवाडं खुली करून आणि जगभर लिंग समानता प्रस्थापित होण्यासाठीच्या कृतींना गती देऊन त्यांचे हक्क अधिक बळकट करण्याची गरज अधोरेखित करणारी आहे. महिला दिनानिमित्त आज अनेकविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नवी दिल्लीत माणेकशॉ सेंटर इथं होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयानं कर्तव्य पथावर महिलांच्या नेतृत्वाखाली शक्ती वॉक नावानं पदयात्रेचं आयोजन केलं आहे. विविध

क्षेत्रातील महिला या पायी फेरीत सहभागी होऊन पुरोगामी आणि समावेशक भारताच्या घडणीत महिला मध्यवर्ती भूमिका बजावत असल्याचं अधोरेखित करणार आहेत. याशिवाय केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीनंही आज नवी दिल्लीत देशव्यापी एथलेटिक्स लीग- अस्मिता या उपक्रमाचं आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून देशभरातील महिला खेळाडूंना तळागाळातल्या पातळीवर स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध झाल्यानं त्या सक्षम बनू शकतील. हा उपक्रम आगामी काळात देशात क्रीडा संस्कृतीचा अधिक प्रसार करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. या अंतर्गत १३ वर्षांखालील तसंच १३ ते १८ वर्षं तसंच त्यापुढील वयोगटाच्या मुली अषा तीन गटात धावण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या जातील.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व नागरिकांना विशेषतः स्त्रीवर्गाला महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महिला स्वयंपूर्ण आणि शिक्षित समाजाचा आणि राष्ट्राचा पाया असून देशाची भरभराट आणि पुढारलेपणा यामध्ये सक्षम महिला योगदान देऊ शकतात असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**राष्ट्रपतीअवमान**

पश्चिम बंगालच्या आपल्या दौऱ्यामध्ये राज्य सरकारनं राजशिष्टाचारांचं पालन केलं नाही याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ९व्या आंतरराष्ट्रीय संथाळी परिषदेसाठी राष्ट्रपती काल सिलिगुडी इथं गेल्या होत्या. राजशिष्टाचारांनुसार विमानतळावर मुख्यमंत्री राष्ट्रपतींचं स्वागत करतात. मात्र बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सध्या कोलकात्यात मतदारयाद्यांमधून कथितरीत्या नावं वगळल्याच्या निषेधात धरणं आंदोलन करीत आहेत. त्या किंवा राज्याचे इतर कोणी मंत्री देखील राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी विमानतळावर उपस्थित नव्हते.

राष्ट्रपती हे सर्वोच्च संविधानिक पद असून या पदाचा शिष्टाचारानुसार योग्य तो सन्मान आणि आदर राखणं आवश्यक आहे, असं उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी यासंदर्भात म्हटलं आहे. त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशातून याबाबत नापसंती व्यक्त केली आहे.

तर, पश्चिम बंगालमधल्या तृणमूल कॉंग्रेस सरकारनं सर्व मर्यादा पार केल्या आहेत अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकारामुळं आदिवासींचाही अपमान झाल्याचं पंतप्रधान म्हणाले.

आम्ही राष्ट्रपतींचा आदर करतो, मात्र निवडणुकांच्या काळात भाजपाच्या सांगण्यावरुन राजकारण करु नका असं आवाहन पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रपतींना केलं आहे. निवडणुकांचा काळात आल्यामुळं राष्ट्रपतींच्या दौऱ्यात सहभागी होता आलं नाही. असंही बॅनर्जी यांनी सांगितलं.

**बॅडमिंटन**

ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या लक्ष्य सेनने पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत १२ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्यने काल बर्मिंगहॅम इथं  झालेल्या उपांत्य सामन्यात कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा २१-१६, १८-२१, २१-१५ असा पराभव केला. आज होणाऱ्या अंतिम फेरीत लक्ष्यचा सामना चायनीज तैपेईच्या लिन च्युन यु याच्याशी होईल.

**क्रिकेट**

आयसीसी पुरुष टी-२० क्रिकेट विश्वचषकासाठी, गतविजेत्या भारताचा सामना आज अहमदाबाद इथं न्यूझीलंडशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारतीय संघ चौथ्यावेळी पोहोचला आहे. तर न्यूझीलंडसाठी हा दुसरा अंतिम फेरीतला सामना असेल.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.